हज़ार योद्धाओं पर विजय पाना आसान है, लेकिन जो अपने ऊपर विजय पाता है वही सच्चा विजयी है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार १ मार्च २०२५ | अंक ८२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# पुणे बलात्कारप्रकरणी मोठा धक्कादायक दावा, आरोपी आणि पीडितेमध्ये रुपयांचा व्यवहार

## आरोपी आणि त्या सदर तरुणीशी ३१ दिवसांपासून ओळख

आम्ही कोर्टाच्या परवानगीने आरोपीशी चर्चा केली. आरोपीने आम्हाला जी माहिती दिली आहे, त्यानुसार आरोपी आणि त्या सदर तरुणीशी ३१ दिवसांपासून ओळख आहे. जर तुम्ही सीसीटीव्ही फुटेज नीट पाहिलं, तर ती तरुणी आरोपीच्या मागे मागे जात आहे. तसेच आरोपी तिला घेऊन जाताना कुठेही जबरदस्ती करत नाही. तसेच बसमधून उतरतानाही आधी आरोपी खाली येतो, त्यानंतर ती येते. त्यानंतर अवघ्या ५० मीटर अंतरावर स्वारगेट पोलीस स्टेशन असताना ती तिथे तक्रार करण्यासाठी तिथे गेली नाही. त्यानंतर ती स्वतःच्या गावाकडे गेली. यानंतर ती हडपसरमध्ये उतरली आणि तिने पुन्हा स्वारगेटमध्ये येत पोलिसात तक्रार दाखल केलीङ्क, असे ॲड. सुमीत पोटे यांनी सांगितले.

पुण्यात एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची मंगळवारी (२५ फेब्रुवारी) पहाटे खळबळजनक घटना घडली. पुण्यातील स्वारगेट एसटी डेपोमध्ये असलेल्या शिवशाही एसटी बसमध्ये तिच्यावर अतिप्रसंग करण्यात आला. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी दत्तात्रय गाडे अटक करण्यात आली असून त्याला १२ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दत्तात्रय गाडे हा ३५ वर्षांचा असून तो शिरुरच्या गुनाट गावात राहतो. याच गावातून पोलिसांनी दत्तात्रय गाडेच्या मुसक्या आवळल्या. पुण्यातील अत्याचार प्रकरणी नवनवीन खुलासे





समोर येत आहेत. त्यातच आता आणखी एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे. पुणे बलात्कार प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या दत्तात्रय गाडेच्या परिचयातील एका वकिलाने धक्कादायक दावा केला आहे. आरोपी आणि पीडित महिनाभरापासून एकमेकांना ओळखायचे, असा दावा ॲड. सुमीत पोटे यांनी केला आहे. घटनेवेळी आरोपी आणि पीडितेमध्ये साडेसात हजारांचा पैशांचा व्यवहार झाला, असेही सुमीत पोटे यांनी सांगितले. मात्र या पैशांच्या व्यवहाराबाबत सुनावणीवेळी कोणताही उल्लेख झाला नाही,

## आरोपीने साडेसात हजार रुपये रोख स्वरुपात दिले

या महिलेला मी साडेसात हजार रुपये रोख स्वरुपात दिले आहेत. त्यावरुन त्यांचे वाद झाले. यानंतर तो आरोपी निघून गेला आणि कुठेही जबरदस्ती केलेली नाही. त्याने तिला ऑनलाईन पैसे देतो, असे सांगितलं. तर तिने ऑनलाईन नको रोख हवे असं सांगितले. त्यामुळे त्याने रोख पैसे दिले. माझं आणि आरोपींचं युक्तीवादानंतर बोलणं झालं.

त्यामुळे मी याबद्दल कोर्टाला काहीही सांगितलेले नाही, अशीही माहिती ॲड. सुमीत पोटे यांनी दिली.त्यांना अश्रू अनावर झाले

# संतोष देशमुखांची हत्या लाईव्ह कोण बघत होतं? खा.बजरंग सोनवणे यांचा सवाल

बीड । प्रतिनिधी संतोष देशमुख यांची हत्या होत असताना लाईव्ह बघितली जात होती, ती हत्या लाइव्ह कोण बघत होते, असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला आहे. मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांना न्याय मिळावा, यासाठी सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनात दि.२६ रोजी त्यांनी भेट दिली. यावेळी माध्यमांशी ते बोलत होते. दरम्यान, आरोपींच्या फोनचा सिडिआर काढून चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली. मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला ७८ दिवस उलटून गेलेले आहेत. अद्यापही या प्रकरणी पोलिसांकडून तपासाला गती मिळालेली नाही. त्यामुळे प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याला तात्काळ अटक व्हावी आणि आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख, भाऊ धनंजय




देशमुख आणि मस्साजोगचे ग्रामस्थ दि.२५ फेब्रुवारीपासून अन्नत्याग आंदोलनाला बसले आहे. या आंदोलनाला दि.२६ रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी भेट दिली. यावेळी मध्यमांशी बोलताना ते म्हणाले, पोलिसांनी अद्यापही आरोपींचे आणि हे प्रकरण वेळेत नोंद न करून घेणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचे सीडीआर का तपासलेले नाहीत?, निवडणुकीत उमेदवाराचे फोन तुम्ही टॅप करतात तर आरोपींचे सीडीआर का नाही काढत? असा सवाल सोनवणे यांनी उपस्थित केला आहे. संतोष देशमुख यांचं अपहरण झाल्यावर सर्व ग्रामस्थ त्यांचा शोध घेत असताना आरोपाच्या भोवऱ्यात असलेल्या पोलीस निरीक्षक पाटील यांनाच कशी संतोष देशमुख यांची बॉडी सापडली?, त्यांचा मृतदेह पोलिसांनाच सापडावा हे संशयास्पद आहे. इतकंच नाही तर संतोष देशमुख यांना मारत असताना हा सर्व प्रकार लाईव्ह बघितला जात होता, ही अंगावर शहारे आणणारी घटना आहे, असा खळबळजनक खुलासा यावेळी बजरंग सोनवणे यांनी केला आहे.

# तिंतरवणीत कपड्याच्या दुकानावर चोरट्यांचा डल्ला.



चकलंबा। प्रतिनिधी शिरूर कासार तालुक्यातील तिंतरवणी येथील कपड्याचे दुकान अज्ञात चोरट्याने (दि.२४) सोमवार रोजी फोडले असून १,६०,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे अज्ञात चोरट्याविरुद्ध चकलंबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . अधिक माहिती अशी कि,अजिनाथ शिवाजी खेडकर (वय ३०) यांच्या चकलंबा रोडवर असलेल्या पांडुरंग या कपड्याचे दुकान फोडून अज्ञात चोरट्याने दुकानातील ४५,००० रुपये रोख व १,१५,००० रुपयांचा कपड्यांचा माल त्यामध्ये साड्या,लहान मुलांच्या जीन्स पॅन्ट,शर्ट इत्यादी असा एकूण १,६०,००० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना (दि.२४) सोमवार रोजी घडली आहे.अज्ञात चोरट्याविरुद्ध चकलंबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे .अधिक तपास चकलंबा पोलीस करत आहेत.

# महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसाद सेवा




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- ङ्गबोल बम! हर हर महादेव!ङ्ख च्या जयघोषात न्हालेल्या परळी नगरीत महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांची अलोट गर्दी झाली होती. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे, श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी देशभरातून आलेल्या शिवभक्तांसाठी अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीच्या वतीने ५० क्विंटल नायलॉन फराळ महाप्रसाद स्वरूपात वाटप करण्यात आला. या शुभकार्याचा प्रारंभ अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीचे अधिकारी

## भक्तांच्या सेवेतच खरी ईश्वरसेवा आहे-प्रकाश सिंह कुलदीप खोब्रागडे

श्री.प्रकाश सिंह व कुलदीप खोब्रागडे यांच्या शुभहस्ते दि. २६ रोजी सकाळी करण्यात आला. श्रद्धेने मंदिरात आलेल्या भाविकांनी महाप्रसादाचा आनंद घेत मोठ्या भक्तिभावाने दर्शन लाभ घेतला. ङ्गभक्तांच्या सेवेतच खरी ईश्वरसेवा आहे,ङ्ख या भावनेतून अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीच्या अधिकाऱ्यांनी .प्रकाश सिंह प्रकाश सिंह. कुलदीप खोब्रागडे.बाबासाहेब चिकाटे . विवेकानंद शिंदे.रोशन कोकुलवार. रघु घनघव.बाळासाहेब मुंडे.अन्वर भाया

कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत, उत्साहात व भक्तीभावाने सेवा अर्पण केली. परळी नगरीत शिवभक्तांच्या सेवेसाठी उभारलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. शिवरायाच्या कृपेने आणि अशा सेवाभावी कार्याच्या माध्यमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत राहो, हीच प्रार्थना!

# रानडुकराच्या हल्ल्यात तीन महिला जखमी

आष्टी प्रतिनिधी - आष्टी तालुक्यामध्ये दिवसेंदिवस रानडुकरांचा सुळसुळाट वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांवर होणाऱ्या हल्ले देखील वाढले आहेत. शेतात काम करणाऱ्या महिलांवर रानडुकराने भर दुपारी हल्ला केल्याने तीन महिला जखमी झाले आहेत. या घटनेने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आष्टी तालुक्यातील हरेवाडी मराठवाडी, पिंपळगाव घाट, हरेवाडी परिसरात रानडुकरांचा




सुळसुळाट झाला आहे. हरेवाडी येथे घराजवळील शेतात दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १:०० वाजता कांदे कापीत असलेल्या महिलांवर रानडुकराने हल्ला केला. रानडुकराने केलेल्या हल्ल्यात मंदाबाई दत्तू मराठे, विमल जाधव, सुमनबाई मराठे या महिला जखमी झाले आहेत. यामध्ये मंदाबाई दत्तू मराठे महिला गंभीर जखमी झाल्याने तिला सिविल हॉस्पिटल अहिल्यानगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तिच्या गालावर व छातीला जास्त मार लागला ही बातमी वन विभागाला कळवल्यानंतर आज दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ पंचनामा करण्यात आला. यावेळी वनविभागाच्या अधिकाऱ्यांसह मोहन मराठे, जे. बी. औटे,दादा मराठे, बाळू मराठे, दत्तू मराठे व हरेवाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

# अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील इष्टांक वाढीसंदर्भात धनंजय मुंडे यांनी घेतला जिल्हानिहाय आढावा

## अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर अन्न व नागरी पुरवठा विभागाचा मंत्री मुंडेंनी घेतला सविस्तर आढावा

## बुलढाणा जिल्ह्यातील केस गळतीबाबत ही घेतली सर्वंकष माहिती

मुंबई (प्रतिनिधी) - राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून मुंबई येथे होणार असून या पार्श्वभूमीवर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी मंत्रालयात विभागाचा जिल्हा निहाय आढावा घेतला. अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील विविध जिल्ह्यात इष्टांक वाढवणे, ई पॉस मशीन सह सर्व अन्य समस्या याबाबत प्रत्येक जिल्ह्याच्या पुरवठा अधिकारी व अन्य अधिकाऱ्यांकडून माहिती घेत धनंजय मुंडे यांनी संबंधितांना योग्य त्या सूचना केल्या. विविध जिल्ह्यांमधील लोकप्रतिनिधींनी मागणी केल्याप्रमाणे तसेच ज्या जिल्ह्याने इष्टांक पूर्ती केली आहे त्यांना वाढीव मागणी असल्यास इष्टांक देण्यासंदर्भात तसेच ईष्टाकाची पूर्ती न केलेल्या जिल्ह्यातील उर्वरित इष्टांक हा अन्य आवश्यकता असलेल्या ठिकाणी हस्तांतरित करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. बुलढाणा जिल्ह्यात रेशनचे धान्य व त्यामुळे केस गळती होत असल्याबाबतच्या काही तक्रारी आल्या असून त्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली व योग्य त्या सूचना केल्या.

### आजारी पण कामावर

धनंजय मुंडे यांच्या दोन्ही डोळ्यांचे नुकतेच ऑपरेशन झाले असून त्यांना बेल्स पाल्सी या आजाराचे निदानही झाले होते. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा आपल्या कामास त्यांनी सुरुवात केली आहे.डोळ्यांची हालचाल आणि अधिक काळजी म्हणून त्यांनी गॉगलचा वापर करत मीटिंग घेतली. अद्यापही स्पष्टपणे सलग बोलण्यास त्रास होत असतानाही त्यांनी आपल्या कामकाजास आता सुरुवात केली आहे.

या बैठकीस विभागाच्या सहसचिव, उपसचिव यांसह सर्व जिल्ह्यांचे जिल्हा पुरवठा अधिकारी आदी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

# राष्ट्रीय विज्ञान दिन

संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला होता. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस उत्साहाने साजरा करतात. भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे जेष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न सर सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी भौतिक शास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकीरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोध निबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पारितोषिक मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान म्हणून साजरा म्हणून साजरा केला जातो. रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयात रामन हे अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते इंग्रजी आणि विज्ञानामध्ये पदवीधर झाले तर १७ व्या वर्षी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रासमध्ये उच्च श्रेणीमध्ये पूर्ण केले. त्यांनतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल पदावर रुजू झाले झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असतानाही त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये भारतीय तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याची नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रमार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का दिसते असा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यामधून प्रकाशाचे विकिरण यावर संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच. प्रकाशाचे विकिकरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारचे किरण सरळ जेंव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्म्याशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरीत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते, ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किरणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली. प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात, त्यांच्या प्रकाश कनिकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत मौलिक आणि आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहेत त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भांडार खुले झाले. त्यामुळेच देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्मानीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संशोधन संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा विध्वंसक कार्यासाठी त्याचा उपयोग होऊ नये असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सर्व भारतीयांना मनापासून शुभेच्छा!

# संयुक्त महाराष्ट्र, कामगार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर

त्रिराज्य योजनेत महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्यामुळे अन्यायाची भावना मराठीजनांत पसरली व संयुक्त महाराष्ट्र चळवळीने पेट घेतला. ङ्गमुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजेफ हे या आंदोलनाचे घोषवाक्य बनलं.महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वासमोर गुडघे टेकले. यामुळे काँग्रेसनेते जनतेच्या नजरेतून उतरले. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे ज्येष्ठ नेत्याने तर नेहरु व संयुक्त महाराष्ट्रात, मला नेहरु महत्त्वाचे वाटतात असे म्हटले.महाराष्ट्र ातील कम्युनिस्ट, सोशालीस्ट व प्रजासमाजवादी पक्षातील डावे पुढारी व काँग्रेसेतरांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा हातात घेतला. सेनापती बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस.एम.जोशी,प्रल्हाद केशव अत्रे, श्रीपाद डांगे,शाहीर अमर शेख,भाई उद्धवराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे हे चळवळीतील महत्त्वाचे नेते ठरले. एस.एम. जोशी, श्रीपाद डांगे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. २० नोव्हेंबर इ.स.१९५५ मोरारजी देसाई व स.का.पाटील या काँग्रेस नेत्यांनी चौपाटीवर सभा घेऊन प्रक्षोभक विधाने केली.पाटलांनी ङ्गपाच हजार वर्षांनी सुद्धा मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही व मोरारजींनी ङ्गकाँग्रेस जिवंत असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, गुंडगिरीला योग्य जबाब मिळेलफ अशी मुक्ताफळं उधळली. लोकांनी संतापून सभा उधळली.२१ नोव्हेंबर इ.स.१९५५ रोजी झालेल्या आंदोलनावेळेस पोलिसांनी केलेल्या गोळीबारामुळे १५ जणांना प्राण गमवावा लागला. जाने-फेब्रु इ.स. १९५६ रोजी केंद्रशासित मुंबईची घोषणा केल्यानंतर लोक रस्त्यावर उतरली. हरताळ, सत्याग्रह व मोर्चे सुरू झाली. मोरारजीच्या सरकारने सत्तेचा दुरुपयोग करून निष्ठूरपणे ८० लोकांना गोळीबारात मारले. संयुक्त महाराष्ट्रातील आंदोलनात एकूण १०५ जणांनी आपल्या प्राणाची आहुती दिली.त्यांच्या स्मरणार्थ मुंबईच्या फ्लोरा फाउंटन भागात हुतात्मा स्मारक उभारले गेले.संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्ली येथे प्रचंड सत्याग्रह घडवून आणला. चळवळीच्या काळात जनतेच्या असंतोषामुळ,नेहरुंना महाराष्ट्र ात सुरक्षारक्षकांसोबत फिरावे लागे व त्यांचे स्वागत काळ्या झेंड्यांनी व निषेधानेच होई.भारताचे अर्थमंत्री सी.डी देशमुखांनी महाराष्ट्रावरील होणाऱ्या अन्यायाच्या निषेधार्थ आपला राजीनामा दिला होता. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरु असताना प्र.के.अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, एस.एम. जोशी, कॉ.डांगे यांना या लढ्याबद्दल डॉ.बाबासाहेबांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसारच हा लढा यशस्वी झाला. बाबासाहेबांच्या दादर, मुंबई येथील ङ्गराजगृहफ या निवासस्थानी संयुक्त महाराष्ट्र लढ्याची दिशा कशी असावी याचे मार्गदर्शन स्वतः बाबासाहेबांनी प्र.के.अत्रे, डांगे, प्रबोधनकार या मंडळींना केलेले आहे.या लढ्याची ज्योत तेवत ठेवण्यासाठी ङ्गमराठाफ या वृत्तपत्रातून प्र.के.अत्रे जसे रान उठवत होते, त्याप्रमाणेच डॉ. आंबेडकर आपल्या ङ्गजनताफ मधून महाराष्ट्रीयन जनतेची बाजू मांडत होते. मुंबईसहित संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या मागणीनेही जोर पकडला. त्याचवेळेस बाबासाहेबांनी ७ जाने. १९५६ ला एक पत्रक प्रसिद्ध करून केंद्र सरकारचा मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याच्या प्रस्तावास विरोध केला. मुंबई हि राज्याची अस्मिता आहे,त्यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर लिहितात - मुंबईचे खरे वारसदार आहेत ते कोळी! जसे कलकत्त्यावर बंगाल्यांचा,मद्रासवर तामिळांचा हक्क पोहोचतो, तर मुंबई शहरावर महाराष्ट्रीयांचा हक्क का पोहचू शकत नाही ? मुंबईत गुजराती लोकांची संख्या केवळ १५ % ,पण ५० % हून अधिक असलेल्या महाराष्ट्रीयांचा हक्क तुम्ही कसे नाकारता ? मुळचे कोळी लोकांची वास्तव्य असलेली मुंबई, पोतुगीजांनी राणी लक्ष्मीबाईकडून भाडेपट्ट्याने घेतली व कब्जा केला. राणी विधवा होती, बिचारी काही करू शकत नव्हती.त्यानंतर ब्रिटीश राजा-दुसरा चार्ल्स याच्या राणीस हुंडा म्हणून मुंबई ब्रिटिशांना देण्यात आली. हुंडा १० पौंडापेक्षा जास्त नव्हता.त्यावेळी मुंबईत फक्त कोळी लोकांचीच वस्ती होती (संदर्भ :-डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, खंड-१०, पृष्ठ क्र. ८५) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनानुसार पुढे दादासाहेब गायकवाड यांनी शोषित-वंचित-कष्टकरी मराठी जनांचा एक अभूतपूर्व मोर्चा मुंबईत काढला होता. कामगार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर.



रत्नपाल डोफे
मु.पो.यवतमाळ,
मो.७४९९६४४२२६,
संस्थापक अध्यक्ष
जनवादी बांधकाम कामगार मजदुर संघटना

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ ला त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. स्वतंत्र मजूर पक्षाचे ते अध्यक्ष होते.स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा ङ्गटाइम्स ऑफ इंडियाफ या इंग्रजी दैनिकात पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आला होता. या जाहीरनाम्यात ध्येय-धोरणे अतिशय सूक्ष्म पद्धतीने विचार करून ठरविली होती. कामगारांच्या उत्कर्षाच्या नि उद्धाराच्या ध्येयाने प्रेरित असलेला, निःसंदिग्ध व जनहितार्थ, संरक्षणार्थ, दक्षता बाळगणारा जाहीरनामा होता.पक्षाचे धोरण स्वष्ट करण्यासाठी दलित वर्ग कर्मचारी परिषद १२,१३ फेब्रुवारी १९३८ ला मनमाड येथे झाली. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले होते, ङ्गब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत.फ तथाकथित समाजव्यवस्थेचा बुरखा फाडून स्वतंत्र मजूर पक्षाला नवा चेहरा कसा देता येईल? पक्ष मजबूत कसा होईल? कामगारांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य कसे दिले जाईल? असा दूरदर्शी, पारदर्शी विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात घोळत होता. परंतु तसे झाले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आत्मविश्वासाला तडा बसला कारण दलित अस्पृश्य वर्गाची संख्या लाखावर असताना पक्ष नोंदणी सदस्यसंख्या कमी झालीत्यांना थोडे दुःख झाले. पण ते डगमगले नाहीत. आशा सोडली नाही. मुंबईच्या १७ मार्च १९३८ च्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्वधारण सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ङ्गगरिबांच्या पक्ष गरिबांनी चालविला पाहिजे.फ हा निर्लेप आशावाद क्षितिजापलीकडचा होता यात शंका नाही. सामाजिक अन्याय,अत्याचाराविरूद्ध, आर्थिक विषमतेविरूद्ध कामगारांनी लढा दिला पाहिजे तेव्हाच कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील.तसेच ङ्गपरावलंबी असण्यापेक्षा स्वावलंबी व्हाफ असा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता. १५ सप्टेंबर १९३८ च्या ट्रेड डिस्प्युट बिलाच्या संदर्भात कौन्सिलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगाराचा अधिकार आणि मालकाने लादलेली बंधने याचा कडाडून विरोध केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मताशी सहमती दर्शवून जमनादास मेथाने डिस्प्युट बिलाचा विरोध केला होता.याच पार्श्वभूमीवर ७ नोव्हेंबर १९३८ ला स्वतंत्र मजूर पक्ष आणि गिरणी कामगारांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्याचा निर्धार केला होता.जमनादास मेथा यांच्या अध्यक्षतेखाली श्रीपाद डांगे, परुळेकर, मिरजकर इत्यादी कामगार नेत्यांनी व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संप यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला होता. हा संप अयशस्वी व्हावा यासाठी गिरणी मालकाने पोलिस बळाचा वापर केला.त्यात ७२ कामगार जखमी झाले.३५ कामगारांना अटक झाली.पण संप यशस्वी झाला. कामगार संघटनांचा विजय झाला.स्वतंत्र मजूर पक्ष बळकट झाला.या कामगारांच्या लढ्यामुळे मालक, भांडवलदार वर्गात प्रचंड खळबळ माजली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिश मंत्रिमंडळात मंजूर मंत्री (१९४२ १९४६) होते. त्यांनी सेवायोजन कार्यालयाची (एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) स्थापना केली. त्याकाळी जे अनुभवी नि अर्धाशिक्षित तज्ज्ञ निरनिराळ्या योजनातून तयार होत होते. त

# मायेचा ओलावा: नागनाथ (नाना) बडे यांचे पक्ष्यांसाठी पाणवठे

उन्हाळ्याच्या रखरखत्या दिवसांत, जेव्हा सूर्य आग ओकत असतो, तेव्हा नागनाथ (नाना) बडे मायेची सावली धरून उभे असतात. ज्येष्ठ साहित्यिक, माजी केंद्रप्रमुख आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व लाभलेले नागनाथ बडे (नाना), पशु-पक्ष्यांच्या हृदयात आदराने कोरले गेलेले नाव आहे.उन्हाच्या तडाख्यात जेव्हा धरणीमाताही कोरडी पडते, तेव्हा नाना आपल्या हातांनी पाणवठे तयार करतात. तहानलेल्या जिवांना पाणी पाजतात आणि त्यांच्यात नवं चैतन्य निर्माण करतात. नानांच्या पाणवठ्याजवळ एक लहानगं चितर पक्षाचं पिल्लू तहानेने व्याकुळ होऊन पडलेलं दिसलं. नानांनी त्याला आपल्या हातांनी उचललं, पाणी पाजलं आणि त्याच्या पंखात पुन्हा बळ भरलं. त्या लहानग्या जीवात जेव्हा पुन्हा शक्ती आली, तेव्हा ते आनंदाने उडून गेलं.

हे दृश्य पाहताना निसर्ग आणि माणूस यांचं नातं किती घट्ट आहे, याची प्रचिती येते. नानांसारखे लोक जेव्हा निसर्गाची काळजी घेतात, तेव्हा ते केवळ पशु-पक्ष्यांनाच नाही, तर आपल्या सर्वांना जगण्याचा खरा अर्थ शिकवतात.

आजच्या जगात जिथे माणूस स्वार्थात बुडाला आहे, तिथे नानांसारखे लोक माणुसकीचा झरा बनून वाहतात. त्यांच्या कार्यामुळे निसर्गाची सुंदरता टिकून राहते आणि पशु-पक्ष्यांना जीवदान मिळते.

नानांचं हे कार्य म्हणजे केवळ एक सेवा नाही, तर ती एक प्रेरणा आहे. त्यांच्याकडून आपण शिकायला हवं की, प्रत्येक पशु-पक्ष्यात जीव आहे आणि त्यांची काळजी घेणं हे आपलं कर्तव्य आहे.

बडे नानांच्या पाणवठ्यावर जेव्हा सूर्य मावळतीला जातो, तेव्हा एक वेगळीच शांतता पसरते. पक्ष्यांचा किलबिलाट आणि पाण्याचा खळखळाट, हेच नानांच्या कार्याची साक्ष देतात.पशु-पक्ष्यांसाठी पाणवठे तयार करून नानांनी निसर्गाच्या रक्षणात मोलाचे योगदान दिले आहे, देत आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेक तहानलेल्या जिवांना जीवनदान मिळाले आहे. त्यांनी समाजासमोर माणुसकीचा एक आदर्श निर्माण केला आहे. नानांचे कार्य भावी पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे.नागनाथ (नाना) बडे यांचे कार्य केवळ एका पाणवठ्यापुरते मर्यादित नाही, तर ते एक व्यापक दृष्टिकोन आणि निसर्गाप्रती असलेली त्यांची अतूट बांधिलकी दर्शवते. बडे नानांचे कार्य हे निसर्गाप्रती असलेल्या त्यांच्या निस्वार्थ प्रेमाचा पुरावा आहे. ते प्रत्येक सजीवांमध्ये दैवी अंश पाहतात आणि त्यांची काळजी घेणे हे आपले कर्तव्य मानतात. आजच्या स्वार्थी जगात नानांसारखे लोक माणुसकीचा खरा अर्थ जिवंत ठेवतात. ते इतरांना निःस्वार्थ सेवा करण्याची प्रेरणा देतात.

बडे नानांचे कार्य पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. ते लोकांना निसर्गाचे महत्त्व आणि त्याचे संरक्षण करण्याची गरज सांगतात.बडे नानांचे कार्य भावी पिढीला निसर्गाची काळजी घेण्यास आणि माणुसकी जतन करण्यास प्रेरित करते.बडे नाना यांच्यासारख्या लोकांकडून प्रेरणा घेऊन, आपणही आपल्या सभोवतालच्या निसर्गाची काळजी घेतली पाहिजे आणि प्रत्येक सजीवाप्रती प्रेम आणि आपुलकी दाखवली पाहिजे.



नागनाथ (नाना) बडे हे केवळ एक साहित्यिक किंवा माजी केंद्रप्रमुख नाहीत, तर ते एक संवेदनशील आणि निसर्गप्रेमी व्यक्ती आहेत. त्यांच्यात प्राणिमात्रांबद्दल असीम प्रेम आणि करुणा आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत जेव्हा पाणी टंचाई जाणवते, तेव्हा त्यांना पशु-पक्ष्यांची चिंता सतावते. त्यांच्या याच संवेदनशीलतेतून पाणवठ्यांची निर्मिती होते.

नाना बडे यांच्या पाणवठ्यांची निर्मिती ही केवळ एक तात्पुरती उपाययोजना नाही, तर ती एक दीर्घकालीन आणि निस्वार्थ सेवा आहे. ते नियमितपणे पाणवठ्यांमध्ये पाणी भरतात आणि त्यांची स्वच्छता ठेवतात. या कार्यासाठी ते कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा करत नाहीत. नाना बडे यांच्या पाणवठ्यांवर अनेक प्रकारचे पशु-पक्षी येतात. तेथे त्यांना पाणी आणि आश्रय मिळतो. नाना बडे त्यांना पाहून आनंदित होतात आणि त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेतात. त्यांच्या मते, पशु-पक्षी हे निसर्गाचे अविभाज्य घटक आहेत आणि त्यांची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे.

नाना बडे केवळ पाणवठे तयार करत नाहीत, तर ते समाजाला निसर्गाचे महत्त्व देखील सांगतात. ते शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांमध्ये जाऊन निसर्ग संवर्धनाबद्दल मार्गदर्शन करतात. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीने आपल्या परीने निसर्गाचे रक्षण केले पाहिजे.

पक्षीमित्र नागनाथ (नाना ) बडे यांचे कार्य भावी पिढीसाठी एक आदर्श आहे. त्यांच्या कार्यामुळे तरुण पिढीला निसर्गाबद्दल प्रेम आणि आदर वाटेल. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडतील.

प्रा..डॉ. सिद्धार्थ तायडे
(९८२२८३६६७५ )

# राजगुरूनगरच्या अश्विनी राजेंद्र पाचारणे यांना सहकार रत्न पुरस्कार

प्रतिनिधि स्नेहा उत्तम मडावी पुणे

खेड येथील राजगुरुनगर सहकारी बँकेच्या संचालक तसेच शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या पुणे जिल्हाध्यक्ष अश्विनी राजेंद्र पाचारणे यांना नुकताच इचलकरंजी येथील पोलीस मित्र असोसिएशन व वेध फाऊंडेशनच्या वतीने सहकार रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार रविवार दि ९ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. अश्विनी राजेंद्र पाचारणे यांचे महिलांच्या सबलीकरणासाठी मोठे योगदान आहे. सामाजिक सांस्कृतिक साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. समाजाच्या उन्नतीसाठी अश्विनीताई सतत कार्यरत असतात तरूणांना उद्योग व्यवसायासाठी मदत करीत असतात. महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांच्या हाताला देवून त्यांचा संसार सुखाचा होण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत असतात. राजगुरुनगर सहकारी बँकेच्या माध्यमातून अनेकांना कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांचा व्यवसाय उभारणी साठी मदत करीत असतात. अश्विनीताई पाचारणे यांना जाहीर झालेल्या पुरस्काराचे सर्व थरांत कौतुक होत आहेत अनेकांच्या शुभेच्छा येत आहेत..



# संत भगवान बाबा प्रतिष्ठानचा सप्ताह म्हणजे राष्ट्रीय एकात्मता दर्शवणारी परंपरा-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

गेल्या २९ वर्षांपूर्वी सुरू केलेला भगवान बाबा प्रतिष्ठान येथील अखंड हरिनाम सप्ताह आज राष्ट्रीय एकात्मतेची परंपरा जपत आहे. विविध सामाजिक उपक्रम राबवून या ठिकाणी सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्रित करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे. श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान येथे २९ वा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी महंत त्रिविक्रमानंद महाराज यांच्या कीर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थित होती. समितीच्या वतीने प्रारंभी स्वागत करण्यात आले तसेच प्रतिष्ठानच्या विकासासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून निधी मंजूर झाल्याबद्दल संयोजकाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, स्व.डॉ.श्रीहरी लहाने यांनी या प्रतिष्ठानसाठी मोठे योगदान दिले आहे. या प्रतिष्ठानच्या विकासासाठी सातत्याने संपर्कात होते सत्ता असो अथवा नसो सेवाभाव ठेवून आपण काम करतो त्यामुळे प्रतिष्ठान साठी मला हातभार लावता आला याची समाधान वाटते श्रद्धेची सुमने वाहण्याची संधी मिळते या ठिकाणी अनेक उपक्रम राबवले जातात वै. बंकट स्वामी महाराजांनी सुरू केलेली किर्तन



परंपरा आज ग्रामीण भागापर्यंत पोहोचले आहे. माणुसकीची शिकवण या माध्यमातून दिली जाते. संत कुठल्या जातीत जन्मले आणि कोणत्या समाजासाठी काम केले यापेक्षा त्यांनी समाजासाठी योगदान दिले हेच महत्त्वाचे असते माणूस कुठल्या जातीत जन्माला यावा हे विधात्याच्या हाती असते, माणसाचा जन्म समाजासाठी कारणी लागतो हेच यातून बोध घेण्यासारखे आहे. मलाही धार्मिक स्थळाच्या विकासासाठी सेवा करण्याची संधी मिळाली आहे. धार्मिक स्थळांचा विकास होणे गरजेचे आहे कारण याठिकाणी हजारो भाविकांची उपस्थिती असते त्यांना सुविधा मिळाल्या पाहिजेत असे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, ह.भ.प. हरिदास जोगदंड, सखाराम मस्के, नवनाथ कुलकर्णी, ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, स्वामी शिवरुद्रनंद महाराज, ह.भ.प.बाबुराव मुंडे, रामनाथ खेडकर, अनिरुद्ध सानप, ॲड.जयंत राख, नाना सानप, नारायण मुंडे, बाजीराव खेडकर, डॉ.सुधाकर आंधळे, गरकळ बाबा, डॉ.माधव सानप, गणेश खाडे, उमेश फड, महादेव घोळवे, प्राचार्य वसंतराव सानप, प्रा.गर्जे,पत्रकार नारायण नागरे, आनंद घुगे, ज्ञानोबा वायबसे यांच्यासह परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत चोखामेळा देवस्थान परळी वैजनाथ येथे महाशिवरात्री उत्सव उत्साहात

## ह.भ.प. विष्णू महाराज कराड इंजेगावकर यांचे कीर्तन संपन्न

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

दि. २६ व २७ फेब्रुवारी २०२५ रोजी संत चोखामेळा देवस्थान परळी वैजनाथ येथे महाशिवरात्री निमित्त एकादशीच्या दिवशी ह.भ.प. विष्णू महाराज कराड इंजेगावकर यांचे कीर्तन आणि बारस भोजन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. शहरातील निजाम काळापासून अस्तित्वात असलेल्या नेहरू चौक जवळील संत चोखामेळा देवस्थान परळी वैजनाथ ट्रस्टच्या जागेवर अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले आहे. परळी शहरातील संत जगमित्र नागा मंदिर, सोपान काका मंदिर आणि संत चोखामेळा मंदिरासाठी निजामाने जमिनी दिल्या होत्या. यासाठी संत चोखामेळा ट्रस्ट स्थापन करून सदर जमीन ट्रस्टच्या ताब्यात देण्यात आली. मात्र, कालांतराने या जमिनीवर चहुबाजूंनी अतिक्रमण झाले आहे.



संत चोखामेळा हे वारकरी संप्रदायातील महान संत होते. पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनापूर्वी भाविक संत चोखामेळा यांचे दर्शन घेतात. संत चोखामेळा यांनी बौद्ध विचारावर समतेची शिकवण दिली आहे. त्यांचे साहित्य परिवर्तनवादी आणि तत्कालीन समाजव्यवस्थे विरुद्ध बंड करणारे होते.

या कार्यक्रमाला दिंडी क्रमांक २५ चे मालक-चालक बापू सावंत, सत्यवान व्हावळे, मुक्ताराम गवळी, सनी ताटे, लक्ष्मण उबाळे, मधुकर जोगदंड, राम भिसे, भगवान साकसमुद्रे, बाबासाहेब मुंडे, लक्ष्मण सोनवणे, सुनील कांबळे, सौ. शारदाबाई पंडित, यशवंत सोनवणे, राहुल घोबळे यांच्यासह संत चोखामेळा देवस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जवाहर विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



चांदा । प्रतिनिधी नेवासा तालुक्यातील चांदा येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन विविध उपक्रमांनी उपप्राचार्य रघुनाथ भोजने यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. साहेब या टोपणनावाने काव्यलेखन करणारे, कुसुमाग्रज गौरव पुरस्काराने सन्मानित कवी,साहित्यिक,निवेदक, जगभरातील साहित्यिकांचे व वाचकांचे हक्काचे व्यासपीठ साहित्य कस्तुरी चे मुख्य संपादक काव्यरत्न प्रा.रावसाहेब राशिनकर(साहेब) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी सुरुवातीला कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर उपस्थितांना काव्यरत्न साहेबांनी आपल्या काव्य गायनातून मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमप्रसंगी पर्यवेक्षक अविनाश रामफळे, सांस्कृतिक मंडळाचे श्रीमती स्वाती दळवी, भावना कांबळे, युवरा गायकवाड,शरयू मरडे, ज्येष्ठ शिक्षक पी. डी.गायकवाड,जे एस.शेटे, डी.जी.निमसे, आर.एन. पाठक,अनंता शेळके,एस.एम.शेख ,प्रा. भाऊसाहेब पानसरे,प्रा.श्रीमती ए.एस.शिंदे,प्रा. श्रीमती एस.आर. फुंदे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक संजय ढेरे यांनी केले. रुक्मिणी सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व अश्विनी दहातोंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.




आज शहरातील संस्कार इंग्लिश हायस्कूल नामलगाव फाटा येथे मराठी भाषा गौरव दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी शिक्षिका अनघा मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.कविवर्य कुसुमाग्रज यांच्या बद्दल माहिती सांगितली. याप्रसंगी मराठी राजभाषा गौरव दिन अशा भितीपत्रकाचे प्राचार्या व उप प्राचार्य यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्या सुजा मॅडम यांनी आपले मनोगत मराठी भाषेत व्यक्त केले. उपप्राचार्य जॉन सर यांनी कुसुमाग्रज व मराठी भाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# १ मार्च रोजी राज्यस्तरीय शैक्षणिक अधिवेशन

बीड । प्रतिनिधी राज्यभरातील खाजगी शिक्षण संस्थांच्या प्रश्नावर शासन दरबारी आवाज उठविण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक १ मार्च रोजी पार पाडणाऱ्या या आदेशनास प्रमुख पाहुणे म्हणून माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यातील विविध शिक्षण संस्था व संघटनांच्या वतीने आयोजित केलेले हे अधिवेशन इंडियन एज्युकेशन सोसायटी , राजा शिवाजी विद्या संकुल , दादर मुंबई येथे सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत भरणार आहे. अशी माहिती शिक्षक नेते श्री उत्तम पवार यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे दिली आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील , शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे , उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत , माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणाऱ्या या अधिवेशनास माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी व कायदे तज्ञ स्वाती दीक्षित हे मार्गदर्शन करणार आहेत . शिक्षण क्षेत्राची सद्यस्थिती व भविष्यकाळ पाहता अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे . या पुढील काळात राज्यभरातील सर्व खाजगी शिक्षण संस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री पवार सर यांनी केले आहे.

# चंदुलाल बियाणीला आता सेलू पोलिसांनी घेतले ताब्यात

परभणी । ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने सेलू पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातराजस्थान मल्टिस्टेटचे अध्यक्ष चंदुलाल बियाणीस बीड कारागृहातून सेलू पोलिसांनी मंगळवारी ताब्यात घेतले. बुधवारी परभणी जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. मुदत संपूनही पैसे परत दिले नसल्याने अभय सुभेदार (रा. सेलू) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून न्यायालयाच्या आदेशाने १० फेब्रुवारीला सेलू पोलिस ठाण्यात राजस्थानी मल्टिस्टेट क्रे डिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष चंदुलाल बियाणी, उपाध्यक्ष बालचंद लोढा, सचिव बद्रीनारायण बाहेती, सहसचिव पी. डी. अग्रवाल, कोषाध्यक्ष विजय प्रकाश लड्डा, सेलू येथील शाखाधिकारी नंदकिशोर सोमाणी अशा सहा जणांवर गुन्हा दाखल केला होता. पोनि. दीपक बोरसे, सपोनि. प्रभाकर कवाळे यांनी तपासादरम्यान अध्यक्ष चंदुलाल बियाणी हे अंबाजोगाई येथील एका ग्राहक फसवणूक गुन्ह्यात बीड येथील कारागृहात असल्याचे पुढे आले. आरोपी चंदुलाल बियाणीला २५ फेब्रुवारीला बीड कारागृहातून ताब्यात घेत अटक केली.बुधवारी जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता, न्या. जी. जी. भरणे यांनी आरोपीला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# शेतीपूरक ई-वाहनामुळे शेतकऱ्यांना होणार लाभ

## महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर व कटरचा समावेश

### ना.पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने पर्यावरण विभागाने घेतला निर्णय



बीड । प्रतिनिधी राज्य शासनाने आपल्या इलेक्ट्रिक वाहन धोरणात एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी आता इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात केला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेती कामासाठी आवश्यक असलेल्या या ई वाहनांचा उपयोग करणे सोपे होणार आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ईलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि वातावरणातील प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर केले होते. मात्र, सुरुवातीला या धोरणात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश नव्हता. त्यावर विचार करून, मंत्री पंकजा मुंडे यांनी या वाहनांचा समावेश धोरणात केला आहे. यासंबंधीच्या शासन निर्णयाचे शुद्धिपत्रक आज काढण्यात आला आहे. शेतकऱ्यांसाठी फायदेः शेतीकामांसाठी ईलेक्ट्रिक वाहनांचा वापर केल्यास शेतकऱ्यांचा इंधनावरील खर्च कमी होईल आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक प्रभावही कमी होईल. यामुळे वातावरणातील वायू प्रदूषणात घट होईल आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या देखील फायदा होईल. याशिवाय, इलेक्ट्रिक वाहने जास्त वेळ चालतात, कमी देखभाल खर्च होतो आणि ऊर्जा वापरामुळे कमी इंधनाची आवश्यकता आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणानुसार, बॅटरीवरील वाहनांची खरेदी करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा फायदा आता शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटर खरेदी करतांना होईल. राज्य सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय आजच जारी केला आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांनी अभ्यास सहलीतून पर्यटन इतिहास रोजगाराच्या संधीची घेतली माहिती

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-किनवट : सरस्वती महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांनी अभ्यास सहलीतून पर्यटन,इतिहास व रोजगाराच्या संधीची माहिती घेतली महाविद्यालयाची शैक्षणिक सहल दिनांक २२ ते २५ फेब्रुवारी या काळात हैदराबाद येथे आयोजित करण्यात आली होती. या अभ्यास



सहलीत दहा विद्यार्थ्यांनी व सात विद्यार्थी असे १७ विद्यार्थी सहभागी झाले होते. सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेमनीवार व प्राचार्य डॉ आनंद भंडारे यांच्या संकल्पनेनुसार आदिवासी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधींची माहिती व्हावी यासाठी इतिहासाच्या माध्यमातून पर्यटन, आदिवासी भागातील पर्यटन रोजगार, विमानतळावरील रोजगार, त्यासाठी लागणारे भाषेचे कौशल्य याबाबत माहिती मिळावी यासाठी या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. हिंदी विभाग प्रमुख डॉ सुनील व्यवहारे, इतिहास विभाग प्रमुख डॉ राम किशन चाटे व श्रीमती करुणा नेमनीवार यांनी या सहलीचे आयोजन केले होते. ऐतिहासिक ठिकाण चारमिनार, गोलकोंडा,चौबाला पॅलेस, सालार्जंग वस्तुसंग्रहालय, जवाहरलाल नेहरू वनस्पती व प्राणी संग्रहालय, राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ, बिर्ला मंदिर , एनटीआर गार्डन, लूंबिनी पार्क लेजर शो यासह डॉ बाबासाहेब आंबेडकर सचिवालय आदि ठिकाणी भेटी दिल्या सहलीत पदव्युत्तर वर्गातील मयुरी मडावी, सूरज लोखंडे,तृतीय वर्षातील विद्यार्थी कोमल म्श्राम, नामिका आरके,लखन कनाके,जगदीश नैताम व साईदत्त पाचपुते यांच्यासह विद्यार्थ्यांनी सहलीत सहभाग घेतला.

# कृत्रिम पाणवठे भागवणार आता वन्यजीवांची तहान

आष्टी । प्रतिनिधी फेब्रुवारी महिन्यातच वाढलेला उष्मा पाहता, पुढील मार्च, एप्रिल या महिन्यात वन्य पशुपक्षांची पाण्यासाठी भटकंती होऊ नये, म्हणून वनविभागाने उन्हाळ्याच्या पुर्वसंध्येलाच वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठ्यात टँकरच्या माध्यमातून पाणी भरण्याचे नियोजन केल्यामुळे आता वन्यप्राण्यांच्या पाण्यासाठी उन्हातान्हात होणा या भटकंतीला ब्रेक लागणार आहे. आष्टी वनविभागाच्या वनक्षेत्र परिसरात बशीच्या आकाराचे जवळपास सतरा कृत्रिम पाणवठे आहेत. यावर्षी फेब्रुवारी महिन्यातच उन्हाच्या तीव्र झळा जाणवत आहेत. त्यामुळे आगामी तीन-चार महिन्यात वन्यजिवांची उन्हातान्हात पाण्यासाठी भटकंती होऊ नये. याकरिता उन्हाळ्याच्या पुर्वसंध्येला वनविभागाकडून नियोजन



करण्यात आले आहे. वनक्षेत्र परिसरातील हरीण, काळविट, कोल्हा, तरस, ससा, उदमांजर, लांडगा, मोर, लांडोर, सायाळ, मुंगूस, रानडुक्कर, व पशुपक्षी इत्यादी वन्यजिवांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येण्याची शक्यता असते. यामुळे वन विभागाकडून वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठ्यात टँकरच्या माध्यमातून पाणी टाकण्यात येत असल्याचे वनपरिमंडळ अधिकारी एल.व्ही. तागड यांनी सांगितले. विभागीय वन अधिकारी अमोल गर्कळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल दत्तात्रेय जायभाय, वनरक्षक कल्पना विधाते, अशोक काळे, किरण पंडलवाड, बाबासाहेब शिंदे, बळीराम यादव, जयदत्त आरगडे यांच्यासह वन कर्मचा यांकडून वन्यजिवांची पाण्यासाठी भटकंती होणार नाही. म्हणून पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्याच्या पुर्वसंध्येलाच वाढता उष्मा पाहता आगामी काळात वन्यजिवांचे पाण्यासाठी हाल होऊ नयेत, म्हणून वनविभागाने कृत्रिम पाणवठ्यात पाणी भरण्याचे केलेले नियोजन हे आशादायक आहे

# सोमवारी लोकशाही दिन

बीड, दि. २८ जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

# साहित्य मनुष्याला जगण्याची प्रेरणा देते - डॉ. रमेश गटकळ

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २८/०२/२०२५साहित्य मनुष्याला जगण्याची प्रेरणा देते असे प्रतिपादन मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय मराठी विभाग आयोजित मराठी भाषा गौरव दिन तथा राजभाषा दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रा. प्रतिभा जाधव यांनी स्वागत गीत सादर केले. पुढे बोलताना डॉ. रमेश गटकळ म्हणाले की, साहित्य माणसाला आत्मिक समाधान देत असते. कोणत्याही साहित्यातून जगण्याची नव प्रेरणा ही मिळत असते. मराठी भाषेचे साहित्य हे समृद्ध असे साहित्य आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यापासून ते आज पर्यंतच्या वेगवेगळ्या लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेला समृद्ध व विकसित करण्याचा प्रयत्न केला. केंद्र सरकारने याच वर्षी मराठी भाषेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात भाषेचा दर्जा दिला. ही मराठी भाषेसाठी गौरवास्पद बाब आहे. गेली कित्येक वर्षे मराठी भाषा अभिजात भाषा बनावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात होते. पण यावर्षी या प्रयत्नाला यश मिळाले. मराठीतील प्रसिद्ध लेखक कुसुमाग्रज यांचा वाढदिवस २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन किंवा राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आतापर्यंत भारतातील ११ भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला आहे. त्यामध्ये आता मराठी भाषेचा देखील समावेश झाला आहे. मराठी भाषेतील साहित्य हे समृद्ध असे साहित्य आहे. हे स्पष्ट करत असताना त्यांनी साहित्यातील वेगवेगळी उदाहरणे दिली. जसे हसत




हसत जगायचे की, कणत-कणत, ठेवले अनंत तैसेचि राहावे चित्ते असू द्यावे समाधान, असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास अशा वेगवेगळ्या साहित्याचे संदर्भ देऊन त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केला. ते म्हणाले की, दर्जेदार साहित्य निर्माण करण्याची जबाबदारी ही साहित्यिकांवर असते आणि मराठी साहित्यातील ब-याच साहित्यिकांनी ती अतिशय उत्तम पद्धतीने पार पाडली आहे. मनं जोडणारी आणि दुवे साधणारी भाषा म्हणजे मराठी भाषा होय. या भाषेमध्ये खरंतर आपण सर्वांनी आपले सर्व व्यवहार हे केले पाहिजेत. इतकेच नव्हे तर आपली स्वाक्षरी देखील आपण मराठी भाषेमध्ये करणे आवश्यक आहे. आपण महाराष्ट्रात जन्मलो पण आपली मुले आपण इंग्रजी शाळेत शिकवतोय ही विसंगती कुठेतरी आपण दूर केली पाहिजे. जसा साहित्यात आहे तसाच जगण्यात आहे हा संदर्भ आपण आपणासही लागू केला पाहिजे. कथा, कादंबरी, कविता,नाटक, निबंध अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून वेगवेगळा संदेश हा वाचकांपर्यंत जात असतो. साहित्यिकांची भूमिका यामध्ये महत्त्वाची असते. म्हणूनच साहित्यिकांनी समाज परिवर्तनासाठी साहित्याची निर्मिती करावी असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले तर आभार डॉ. प्रेम राठोड यांनी मानले. प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी शांतिमंत्राने कार्यक्रमाचा समारोप केला. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज मुळ्ये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, डॉ. विनायक देशमुख तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व

# गाळमुक्त धरण योजनेचा लाभ गेवराईतील शेतकऱ्यांनी घ्यावा-आ.विजयसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी गाळमुक्त धरण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आ.विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून गेवराईमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, जिल्हाधिकारी अविनाश पाठक व नाम फाऊंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके यांनी यावेळी मार्गदर्शन केले. मतदार संघातील नदी नाल्यांचे खोलीकरण, सरळीकरण व रुंदीकरण कामासह तलावातील गाळ काढण्याचा यामध्ये समावेश असून आता शेतकऱ्यांना गाळ घेवून जाण्यासाठी अवनी पच्या माध्यमातून प्रतीहेक्टरी १७ हजार रुपये अनुदान मिळणार आहे. त्यामुळे गाळमुक्त धरण योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले. गाळमुक्त धरण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आ.विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून गुरुवार, दि.२७ रोजी दुपारी र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्रात जय भवानी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, नाम फाऊंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके यांच्यासह आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, तहसिलदार संदिप खोमणे,




गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे, जि.प. लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हेमंत पिंपळगावकर, बीड पाटबंधारे विभागाचे उपअभियंता विशाल हात्ते, जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता नखाते, जिल्हा जलसंधारण अधिकारी अभियंता आर.डी.पठाण यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी संपुर्ण योजनेचा आढावा घेवून आराखडा अंतिम मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना दिल्या. गेवराई शहरालगतच्या विद्रुपा नदीवरील शहरातील कचरा मोठ्या प्रमाणावर टाकल्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले होते. महापुर परिस्थितीत या नदीचे पाणी शहरातील नागरीकांच्या घरात गेल्यामुळे नदीकाठच्या नागरीकांचे मोठे नुकसान झाले या पार्श्वभुमीवर आ.विजयसिंह पंडित यांनी विद्रुपा नदी गाळमुक्त करण्यासाठी त्याचे खोलीकरण, सरळीकरण व रुंदीकरणाचे काम या योजनेत समाविष्ट केलेले आहे. विद्रुपा नदीबरोबरच गेवराई तालुक्यातील अमृता नदीचा समावेश सुध्दा या योजनेत करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेत नाम फाऊंडेशन आणि टाटा मोटार्स यांचाही मोठा सहभाग असणार आहे. या योजनेसाठी अवनी पची निर्मिती केली असून योजनेच्या माध्यमातून निघणारा गाळ घेवून जाण्यासाठी शेतकऱ्यांना प्रतीहेक्टरी १७ हजार रुपये शासन अनुदान मिळणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवून आपली शेती समृध्द करून घ्यावी असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले आहे. गाळमुक्त धरण योजना अधिक सक्षमपणे राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करून अंतिम मान्यतेसाठी तातडीने पाठविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या. जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्याच्यावतीने ठोंबरे यांनी या बाबतची माहिती दिली. चर्चासत्राला भवानी बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे, जय भवानी कारखान्याचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, खरेदीविक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, उपसभापती विकास सानप, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, गेवराई तालुक्यातील संबंधित गावचे सरपंच, ग्रामसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोईठाण येथे डीजे मुक्त शिवजयंती साजरी



आष्टी तालुक्यातील डोईठाण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजयंती उत्सव समिती यांच्यावतीने डीजेला फाटा देत लेझीम व पारंपारिक वाद्य वाजवून शिवजयंती साजरी करण्यात आली. यामध्ये सकाळी महाराजांच्या अर्धाकृती आता कधी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी यावेळी पद्मावती विद्यालय डोईठाण येथील शालेय विद्यार्थ्यांनी चित्त थरारक कसरती व हलगीच्या तालावर लेझीम कला सादर केली. शिवरायांच्या जीवनावर आधारित पोवाडे तसेच भाषण पार पडली यानंतर संध्याकाळी आठच्या वेळेस छत्रपती शंभुराजे यांच्या जीवनावर गाजत असलेला सध्याचा छ व हा सिनेमा पूर्णपणे गावातील व पंचक्रोशीतील सर्व लहान थोर महिला भगिनी व शिवभक्तांना मोफत दाखवण्यात आला अशा पद्धतीने शिवजयंती ही डीजे मुक्त साजरी करण्यात आली.

## अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला अधिक गतिमान बनवेल. - डॉ. महेश गोलेकर



खर्डा ( प्रतिनिधी) श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे, श्री संत गजानन महाविद्यालय येथे मराठी विभागाच्या वतीने ममराठी भाषा गौरव दिनफ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा विद्यापीठ येथील मराठी विभागाचे डॉ. चिन्मय घैसास यांनी मराठी भाषेतील रोजगाराच्या संधी या विषयावर आभासी व्याख्यान दिले. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर लाभले, त्यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणात अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला अधिक गतिमान बनवेल असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन आवारे होते. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी बनवून आणलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मराठी वांग्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी केले तर आभार प्रा. मोहसीन शेख यांनी मानले.

# मोरेवाडी साठवण तलावाच्या भूमिपूजन झाल्याशिवाय मोरेवाडीत येणार नाही हा शब्द मी पूर्ण केला- आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी) मोरेवाडी साठवण तलावासाठी मी गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न करत असून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मी एकट्याने प्रयत्न केला आणि प्रमाणपत्र मिळवल्यानंतर गेल्या दहा वर्षातील दोन लोकप्रतिनिधींनी याविषयी एक कागद हलवलेला नाही. त्यामुळे मी साठवण तलावाचे भूमिपूजन करण्यासाठीच गावात येईल असा मोरेवाडीकरांना दिलेला शब्द आज पूर्ण करत आहे.या साठवण तलावाच्या भूमिपूजनासाठी मोरेवाडी येथे आलो आहे.या तलावामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.ते मृद व जलसंधारण विभाग बीड यांच्या अंतर्गत आष्टी तालुक्यातील मोरेवाडी साठवण तलाव भूमिपूजन समारंभ प्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते.



लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते साठवण तलाव कामाचे भूमिपूजन करण्यात आले.आ.धस बोलताना पुढे म्हणाले की,२०१४ पासून या तलावाच्या कामासाठी आपण होतो.त्याच काळात पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळाले.मात्र हे काम गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित होते. या दहा वर्षाच्या कालावधी नंतर आज प्रत्यक्षात या तलावाचे काम सुरू होत आहे.याचा मनस्वी आनंद होत आहे. या तलावामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.मोरेवाडी ग्रामस्थांची अनेक दिवसापासूनची ही



मागणी होती मागील दहा वर्षांमध्ये या कामात कोणतीही प्रगती झालेली नाही.मोरेवाडीला या तलावाच्या भूमिपूजनाच्या अगोदर येणार नाही असे आपण ठरवले होते. अखेर मोरेवाडी साठवण तलावाचे आज भूमिपूजन करण्यात आले आहे.साठवण तलावाने मोरेवाडी ग्रामस्थांच्या अनेक दिवसांचा प्रश्न मार्गी लागणार असून यातून शेतकऱ्यांच्या जीवनात या प्रकल्पामुळे संजीवनी ठरणार हा प्रकल्पातून शेतकऱ्यांचे जीवमान उंचावण्याचे काम या प्रकल्पामुळे होणार आहे.या साठवण तलाव ७ कोटी ६९.६७ लक्ष रुपये खर्च करून या साठवण तलाव तयार होणार होणार आहे.शेतकऱ्यांचा भुसंपादनाचा देखील प्रश्न मार्गी लागणार आहे.

यावेळी मोरेवाडी, शेलारवाडी,केरुळ किनी या गावात या गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प. संतोष महाराज मोरे,ह.भ.प.लाड महाराज,ज्येष्ठ पत्रकार प्रफुलभाऊ सहस्रबुद्धे, रामहरी महारनोर,अशोक ढवण,सुनील सूर्यवंशी, सरपंच संजय थोरवे, सरपंच अंकुश गीते, शिवाजी अनारसे, कल्याण काकडे, सुंदरलाल गर्जे, भाऊसाहेब गोंदकर, संजय पवार,नामदेव काकडे, महादेव मोरे, जाकीर शेख, झाकीर शेख,संजय निंबाळकर,पप्पू बांदल,उपसरपंच सय्यद,माऊली फंड, ज्युनिअर इंजि.मुंडे साहेब आदी उपस्थित होते.

# शिवद्रोही कोरटकरला अटक करा. संभाजी ब्रिगेड कडून तक्रार दाखल

लातूर. छत्रपती शिवराय बाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणारा मस्तवाल शिवद्रोही प्रशांत कोरटकर (नागपूर) या व्यक्तीवर महापुरुषांची बदनामी, धार्मिक भावना दुखावणे, सामाजिक व जातीय तेढ निर्माण करणे व जीवे मारण्याच्या धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी यासाठी संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र च्यावतीने लातूर अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्याकडे प्रदेश उपाध्यक्ष आण्णासाहेब सावंत. प्रदेश संघटक उमाकांत उफाडे. जिल्हा सचिव रफिक शेख यांनी रीतसर तक्रार दाखल करण्यात आली यावेळेस संबंधितांवर गुन्ह्या दाखल झाला असून पोलीस आरोपीस अटक करण्याच्या प्रयत्नात आहेत अशी माहीती देण्यात आली. प्रशांत कोरटकर (नागपूर) या व्यक्तीने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन कॉल करून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व मांसाहेब जिजाऊ यांच्याबद्दल हिणकस व गलिच्छ वक्तव्ये करून बदनामी केली आहे. तसेच संबंधित व्यक्तीने विकृत लेखक जेम्स लेन याने केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि मांसाहेब जिजाऊ यांच्याबद्दलच्या अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. मराठा समाजाला शिवीगाळ करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे.



महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन सदर व्यक्तीने ही वक्तव्ये व धमकी देत असल्याने हे प्रकरण संवेदनशील आहे. प्रशांत कोरटकर या व्यक्तीने संबंधित ऑडिओ कॉलमध्ये पुढील वक्तव्ये केली आहेत :

१) ब्राह्मणांच्या शासनात तुम्ही काम करत आहे हे लक्षात ठेवा. २) बाजीप्रभू नसते तर तुमचा महाराज जीवंत नसता. ३) तुमचे महाराज पळून गेले. ४) जेम्स लेनचे पुस्तक वाचा, लोकांना सांगा जेम्स लेनने काय म्हटले आहे, व्हू इज बायोलॉजिकल फादर ऑफ शिवाजी, हे लोकांना सांगा. ५) ब्राह्मणांना कमी समजू नका, तुम्हाला ब्राह्मणांची ताकत दाखवतो, मग तुम्ही कितीही मराठे एकत्र करा. ६) छत्रपती शिवाजी महाराजांना देशापर्यंत पोहोचवणारा भालजी पेंढारकर हा ब्राह्मण होता, नाहीतर तुमचा छत्रपती कुठे गेला असता माहीत पडलं नसतं. ७) *** रेकॉर्ड कर तुझ्या बापाला, ब्राह्मणांना बोलशील ना तर तुझी *** मारून टाकेन *** ८) ज्यादिवशी ब्राह्मणाचा शब्द काढशील त्यादिवशी परशुरामाचा परशू तुझ्या *** घुसवील *** ९) तुला तिथं येऊन मारीन. १०) तुला घरात येऊन मारीन ***..

राज्य सरकार, गृह विभाग व पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशांत कोरटकर (नागपूर) या व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि त्याच्यावर कायदेशीर कारवाई करून कठोरात कठोर शिक्षा करावीत तोपर्यंत संभाजी ब्रिगेड स्वस्थ बसणार नाही असा इशारा देण्यात आला.

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड, दि. २८ :- मराठा, ओबीसी,धनगर समाजाच्या वतीने आरक्षण मागणी अनुषंगाने आंदोलने चालु आहेत.सध्या मस्साजोग ता. केज जि. बीड पोस्ट केज येथे दाखल असलेल्य खुनाचे गुन्हयाचे अनुषंगाने विविध राजकिय पक्ष संघटना यांच्याकडून सदर गुन्याहतील आरोपीतांना कठोर शासन व्हावे या व इतर मागणीसाठी अन्नत्याग आंदोलन दि. २५ फेब्रुवारी रोजीच्या १०.०० वाजेपासून सुरु करण्यात आलेले आहे. त्याच मागणीसाठी अचानक आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही, राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागणी करीता विविध प्रकारचे निदर्शने आंदोलने, उपोषणे, मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता येत आहे. यांच्याकडून सदर गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपीनां कठोर शासन व्हावे या मागणीकरिता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागणीसाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यदी होण्याची शक्यता आहे. तसेच दि. ११ फेब्रुवारी २०२५ पासून इयत्ता १० वी आणि २१ फेब्रुवारीपासून १२ वी बोर्डाची परिक्षा सुरु आहेत. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई हुकूम जारी करण्यात आला आहे.दिनांक ३ मार्च २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १७ मार्च २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकायांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## संशोधन आणि नवसंशोधनाला प्रोत्साहन देण्याची गरज - डॉ. विनायक देशमुख

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २८/०२/२०२५सध्याच्या युगात संशोधन आणि नवसंशोधनाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे असे प्रतिपादन डॉ. विनायक देशमुख यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय विज्ञान मंडळ आयोजित राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रा. प्रतिभा जाधव यांनी स्वागत गीत सादर केले. पुढे बोलताना डॉ. विनायक देशमुख म्हणाले की, सी. वी. रमण यांनी नेचर नावाच्या मासिकातून प्रकाश किरणे परावर्तित करण्याविषयीचा नियम शोधून काढला व या अविष्कारास पुढे नोबेल पारितोषिक जाहीर झाले. खरंतर हा भारतीय ज्ञान परंपरेचा गौरव आहे असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. सुरुवातीस अग्नीच्या शोधापासून विज्ञानात चाक, संगणक आणि आत्ता ही प्रगती आर्टिफिशियल इंटेलिजन्स अख अशा ज्या सुधारणा होत आहेत त्या ख-या अर्थाने वैज्ञानिक प्रगतीचे एक द्योतक आहे. आपल्यासारख्या प्राध्यापकांनी वाचन आणि संशोधन कार्यात आपला बहुमोल वेळ हा दिला पाहिजे आणि नवनवीन शोध लावले पाहिजेत. जेणेकरून विज्ञानाचा फायदा हा मानवी समाजास कसा होईल याचा विचार प्राध्यापकांनी करणे गरजेचे आहे. नवनवीन पेटंट आपण मिळवले




पाहिजेत यातून आपल्याबरोबरच आपल्या समाजाचा विकास होण्यास देखील मदत होईल असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केला. ते म्हणाले की, विज्ञान हे माणसाचे जगणे समृद्ध करत असते. विज्ञानाने नवनवीन अविष्कार निर्माण केले आहेत त्यातून माणसाचे जीवन हे सुखकर बनले आहे परंतु या सुखकर जीवनाचा आभास होऊ नये याची काळजी आपण सर्वांनी घेतली पाहिजे. सी. व्ही. रमण यांनी जो शोध लावला या शोधाच्या स्मृतिपत्यार्थ त्यांना नोबेल पारितोषिक जाहीर झाले. खरंतर हा आपल्या भारतीय ज्ञानाचा गौरव आहे. परंतु आपण प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी यातून प्रेरणा घेऊन नवनवीन शोधाविष्कार निर्माण करावेत असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले तर आभार डॉ. प्रेम राठोड यांनी मानले. प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी शांतिमंत्राने कार्यक्रमाचा समारोप केला. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, डॉ. रमेश गटकळ तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# संतांच्या शिकवणीतून मराठवाड्याला संघर्षशीलतेचा मंत्र मिळाला : अजित पवार

### उमरज कलशारोहण सोहळ्यानिमित्त उपमुख्यमंत्र्यांची भेट

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : स्वातंत्र्यपूर्व काळापासून मराठवाड्याला सहजासहजी काही भेटले नाही.तरीही मराठवाड्याने संघर्ष सोडला नाही.सहनशक्ती आणि संघर्षशीलता मराठवाड्याच्या संतांनी दिलेली शिकवण आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे केले. उपमुख्यमंत्री अजित पवार नांदेड व परभणी जिल्ह्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आले आहेत.नांदेड वरून हेलिकॉप्टरने जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील धाकटे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असणारे श्री.क्षेत्र उमरज येथील प्राचीन श्री. संत नामदेव महाराज संस्थान मंदिराच्या कलशारोहण सोहळ्यानिमित्त १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह तथा श्रीमदब भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. अडीचशे वर्षाची परंपरा आणि सात मठाधिपतीनी आत्तापर्यंत या ठिकाणी आध्यात्मिक कार्य केले आहे. यासाठी या परिसरातील हजारो भाविक उपस्थित झाले होते.आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्त भाविकांशी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संवाद साधला.यावेळी मंचावर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार विक्रम काळे, तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा प्रवक्ते देवकीनंदन ठाकूर महाराज,संत नामदेव महाराज संस्थान उंबरजचे श्री.संत महंत एकनाथ नामदेव महाराज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आगमनानंतर येथील नामदेव महाराज समाधीचे व विठ्ठल रखुमाई मंदिराचे दर्शन घेतले. संस्थांच्यावतीने त्यांचे





आगमनाप्रती स्वागत करताना खोबऱ्याच्या भव्य हाराने परंपरेनुसार स्वागत करण्यात आले.यावेळी उपस्थित भाविकांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्यातील संत परंपरेचा गौरव केला. मराठवाड्याची भूमी संतांची ,कलावंतांची, शूरांची व विरांची असून मराठवाड्याला संघर्षाशिवाय सहजासहजी काही मिळाले नाही. मात्र संतांच्या शिकवणीतून संघर्षशीलता व संयम हे गुण या ठिकाणच्या मातीमध्ये आले आहे. संतांच्या शिकवणीतून सर्वधर्मसमभावाचा मंत्र बुलंद व्हावा. या ठिकाणचा आध्यात्मिक सोहळा सामाजिक एकोप्याची नांदी ठरावी, अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या. नामदेव महाराज संस्थानच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यात येईल ,अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. संस्थांच्या ट्रस्टीने त्यांना काही निवेदन यावेळेस सादर केले. तत्पूर्वी त्यांनी मंदिर परिसरात भेट देऊन समाधी दर्शन घेतले. यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनीही संबोधित केले.तत्पूर्वी, आज सकाळी नांदेड येथील श्री. गुरुगोविंद सिंह जी नांदेड विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यात आले. या स्वागताला प्रतापराव पाटील चिखलीकर, आ.बालाजी कल्याणकर आ.आनंद शंकर तिडके, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी नांदेड येथील पवित्र श्री.हुजूर साहिब गुरूद्वारा अबचलनगर जाऊन दर्शन घेतले. गुरुद्वारा येथील ट्रस्टीमार्फत त्यांचे स्वागत करण्यात आले. विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com